**स्थायी निदेश क्र. २९**

**अनियमित / रोजंदारी / कंत्राट पध्दतीवर / मानधनावर / हंगामी पध्दतीने नेमलेल्या कर्मचाऱ्यांनी सेवेत सामावून घेण्यासाठी न्यायालयात दाखल केलेल्या याचिकेच्या अनुषंगाने मार्गदर्शक तत्वे.**

नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
शासकीय परिवहन सेवा इमारत,
३ रा मजला, सर पोचखानवाला मार्ग, वरळी, मुंबई - ४०० ०३०.
क्र. नपप्रसं/१ ते ६/१ ते ३५/१ ते २२२ + ३/स्थायी निदेश/२००५/प्र.क्र.२१०/५
दिनांक :१७.३.२००५

१) राज्यातील बऱ्याच नगरपरिषदांमध्ये विहित मार्गाचा अवलंब न करता अनियमित/ नियमबाहय रोजंदारीवर/कंत्राटी पध्दतीवर/मानधनावर / हंगामी कर्मचारी नेमतात असे निदर्शनास आले आहे. पुढे हेच कर्मचारी २४० दिवस भरल्यानंतर, कामगार न्यायालयात / औद्योगिक न्यायालयात तसेच उच्च न्यायालयात सेवा नियमित करण्याकरीता याचिका दाखल करतात. न्यायालयात नगरपरिषदा त्यांची बाजू समर्थपणे मांडली जात नसल्यामुळे न्यायालयाचे निकाल नगरपरिषदेच्या विरुध्द लागतात.

२) रोजंदारी / हंगामी / मानधन / कंत्राटी कर्मचाऱ्यांच्या संदर्भात मा. सर्वोच्च / उच्च न्यायालयात दाखल झालेल्या विविध याचिकांमध्ये मा.न्यायालयाने वेळोवेळी दिलेले महत्वाचे निर्णय खालीलप्रमाणे दिलेले आहेत.

अ) नगरपरिषदांचा उल्लेख "राज्य" (State) असा करण्यात आला आहे. सार्वजनिक संस्थेमध्ये भरती करतांना नगरपरिषदेने मोठयाप्रमाणावर जाहीर प्रसिध्दी दिली पाहीजे किंवा सेवायोजन / निवड मंडळ कार्यालयातून पात्र उमेदवारांची यादी मागविली पाहीजे जेणेकरुन पदभरतीची प्रक्रिया सर्वांना माहित झाली पाहीजे. ही बाब नगरपरिषदेवर बंधनकारक आहे.

ब) अनियमित नेमणुकीस जबाबदार असलेल्या पदाधिकारी/ अधिकारी/ कर्मचारी यांचेवर जबाबदारी निश्चित करुन, मुंबई लेखा परिक्षक स्थानिक निधी कायदा १९३० मधील तरतुदीनुसार भार अधिभाराखाली झालेला खर्च वसुल करण्याची कार्यवाही करण्यात यावी.

क) कोणत्याही आस्थापनेत हंगामी कर्मचाऱ्यांना नियमित करणे हा कर्मचारी नियुक्तीचा अधिकृत मार्ग कधीही ठरु शकत नाही. जे मागील दाराने सेवेत दाखल झालेले आहेत ते त्याच पध्दतीने कमी करण्यात यावेत. कितीही वर्षे हंगामी म्हणून नोकरी केली म्हणून कोणीही कर्मचारी त्या पदावर नियमित होण्याचा हक्क सांगू शकत नाही. अशा कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे अथवा त्यांची सेवा किती वर्षे झाली आहे या गोष्टी गैरलागू ठरतात.

ड) रोजंदारीवर नियुक्त केलेली व्यक्ती ही कुठलेही पद धारण करीत नसल्यामुळे अशा व्यक्तींना "समान कामासाठी समान वेतन " हा लाभ मिळण्याचा हक्क पोहचत नाही.

इ) एखादया कामावरील रोजंदारी कर्मचाऱ्याचे ते काम संपल्यामुळे त्यांना इतर दुसऱ्या रिक्त जागांवर नेमणूक देण्याचे आदेश न्यायालय देऊ शकत नाही.

ई) अनियमित / बेकायदेशीर नेमलेल्या कर्मचाऱ्यांना भारतीय घटनेच्या कलम २२६ अन्वये न्यायालयाला प्राप्त झालेल्या स्वेच्छाधिकाराअंतर्गत दाद मागण्याचा हक्क पोहचत नाही.

उ) पदे अस्तित्वात नसतांना नेमलेल्या रोजंदारी कर्मचाऱ्यांना नगरपरिषद प्रशासन संचालनालयामार्फत पद निर्माण झाल्याशिवाय कायम करण्याचा प्रश्न उद्भवत नाही.

३) वरील निर्णयाबाबत सांराश खालीलप्रमाणे आहेत. तसेच वरील सर्व व इतर न्यायालयीन निर्णय www.supremecourtonline.com व www.supremecourtofindia.nic.in (JUDIS) या वेबसाईटवर उपलब्ध आहेत.

अ) श्री. उत्तम आणि इतर विरुध्द दारव्हा नगरपरिषद निर्णय १९७२ Mh LJ ८७४ नुसार भारतीय घटनेच्या कलम १२ नुसार नगरपरिषदांचा ``राज्य`` **(state)** असा उल्लेख करण्यात आलेला आहे. नगरपरिषदा हया सार्वजनिक संस्था आहेत. हया सार्वजनिक संस्थेमध्ये भरती करतांना नगरपरिषदेने मोठयाप्रमाणावर जाहीर प्रसिध्दी दिली पाहीजे किंवा सेवायोजन / निवड मंडळ कार्यालयातून पात्र उमेदवारांची यादी मागविली पाहीजे जेणेकरुन पदभरतीची प्रक्रिया सर्वांना माहित झाली पाहीजे. ही बाब नगरपरिषदेवर बंधनकारक आहे. मा. न्यायालयात परिच्छेद निहाय उत्तरे सादर करतांना संबधितांना हा मुद्या मा न्यायालयाच्या निदर्शनास आणणे आवश्यक आहे व अनियमित / हंगामी / रोजंदारी नेमणूकांमध्ये पदभरतीची जाहिर प्रसिध्दी व सर्व पात्र उमेदवारांना नोकरीची समान संधी या तत्वाचे पालन होत नसल्याचे निणदर्शनास आणावे.

ब) मा.उच्च न्यायालय खंडपीठ नागपूर यांचे मलकापूर नगरपरिषदेच्या अनियमित नेमणुकीचे संदर्भातील याचिका क्र.६४०/१९९७ मध्ये पदभरतीसाठी संबंधित उमेदवार विहित अर्हता प्राप्त करीत आहेत काय याचा कोणताही विचार न करता अनेक नगरपरिषदेने बेकायदेशीर पध्दतीने नियुक्त्या केलेल्या आहेत. मागील दाराने बेकायदेशीर नियुक्त केलेल्या कर्मचा-यांना त्यांच्या नियुक्त्या नियमित करण्याचा कोणताही कायदेशीर हक्क पोहचत नाही. असे मा. न्यायालयाचे स्पष्ट मत होते. त्याप्रमाणे अशा बेकायदेशीर नियुक्त्या विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक किंवा संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्या निदर्शनास आल्यास, अशा सार्वजनिक संस्थेमध्ये भरती करतांना नगरपरिषदेने मोठयाप्रमाणावर जाहीर प्रसिध्दी दिली पाहीजे किंवा सेवायोजन / निवड मंडळ कार्यालयातून पात्र उमेदवारांची यादी मागविली पाहीजे जेणेकरुन पदभरतीची प्रक्रिया सर्वांना माहित झाली पाहीजे. ही बाब नगरपरिषदेवर बंधनकारक आहे. मा. न्यायालयाने निदेश दिलेले आहेत. ज्या नगरपरिषदांमध्ये बेकायदेशीर पध्दतीने पदभरती करण्यात आलेली आहे अशा नगरपरिषदेच्या कार्यपध्दतीस प्रतिबंध करण्याचा मा. न्यायालयाचा दृष्टीकोन वरील आदेशावरुन स्पष्ट आहे. परिच्छेद निहाय उत्तर सादर करतांना संबधितांनी हा निर्णय निदर्शनास आणावा व अशा हंगामी / रोजंदारी / अनियमित नेमणूका नियमित करणे योग्य होणार नाही उलट संबधितांची वसूली करण्याचे मा. न्यायालयाचा निर्णय आहे हे दाखवून दयावे.

क) मा. सर्वोच्च न्यायालयाचे सायटेशन २००४ एसओएल केस क्र.५०० मध्ये तामिळनाडू राज्य सहकारी संस्थामधील कर्मचारी भरती संदर्भातील अपील क्र.१४१३/२००३, दि.२८.७.२००४ ए उमराणी विरुध्द निबंधक, सहाकारी संस्था आणि इतर या मधील निर्णयानुसार तामीळनाडू राज्यात सहकारी सोसायटीमधील मोठया प्रमाणावर कर्मचारी भरती विहित पध्दतीचा अवलंब न करता व सेवायोजन कार्यालयाकडून उमेदवारांची यादी न मागविता करण्यात आली होती. या भरतीमध्ये उमेदवारांची शैक्षणिक पात्रता वा राखीव जांगाचे धोरण याचाही विचार करण्यात आला नव्हता. या अनियमित नेमणूका वेळोवेळी आदेश काढून तामीळनाडू सरकारने नियमित केलेल्या होत्या.

त्या आदेशाविरुध्द मा. सर्वोच्च न्यायालयात सदरची याचिका दाखल झाली होती. त्या याचिकेतील निर्णयानुसार मा. सर्वोच्च न्यायालयानी खालीलप्रमाणे निर्णय दिला.

i) कायद्याने स्थापन झालेल्या आणि शासन या वर्गात मोडणाऱ्या कोणत्याही आस्थापनेत हंगामी कर्मचाऱ्यांना नियमित करणे हा कर्मचारी नियुक्तीचा अधिकृत मार्ग कधीही ठरु शकत नाही.

ii) जे मागील दाराने सेवेत दाखल झालेले आहेत ते त्याच पध्दतीने कमी करण्यात यावेत.

iii) हंगामी कर्मचाऱ्यांची नेमणूक करतांना शैक्षणिक पात्रता व अन्य पात्रतेची पुर्तता केली जात नाही. शिवाय या नेमणूका करतांना राखीव जागांचे प्रमाणही पाळले जात नाही. त्यामुळे सरकार आपले प्रशासकीय अधिकाराचा वापर करुन अशा नियमबाहय नेमणूका नियमित करु शकत नाही.

iv) एखादया पदावर कितीही वर्षे हंगामी म्हणून नोकरी केली म्हणून कोणीही कर्मचारी त्या पदावर नियमित होण्याचा हक्क सांगू शकत नाही.

v) अनियमितरित्या नेमणूक करण्याचे प्रकार सर्वत्र वाढीस लागल्याने जे विहित पध्दतीने नेमणूकीसाठी मोठयाप्रमाणात प्रतिक्षेत आहेत अशा उमेदवारामध्ये नैराश्याची भावना निर्माण झालेली आहे. त्यामुळे मागील दाराने दाखल झालेल्यांना सेवेत नियमित करण्याचा हक्क राहत नाही.

ड) तसेच वरील निकष लावतांना अशा कर्मचाऱ्यांची संख्या किती आहे अथवा त्यांची सेवा किती वर्षे झाली आहे या गोष्टी गैरलागू ठरतात.

इ) हरीयाणा सरकार विरुध्द तिलकराज प्रकरण (६ SCC १२३/२००३) मधील निर्णयानुसार रोजंदारीवर नियुक्त केलेली व्यक्ती ही कुठलेही पद धारण करीत नसल्यामुळे अशा व्यक्तींना "समान कामासाठी समान वेतन " हा लाभ मिळण्याचा हक्क पोहचत नाही.

फ) मा. सर्वोच्च न्यायालय निर्णय सिव्हील अपील क्र. ३४९२/१९९६, दि.२४.१.१९९६ हिमाचल प्रदेश राज्य विरुध्द सुरेशकुमार वर्मा मधील निर्णयानुसार रोजंदारीवर एखादयाची नियुक्ती ही त्या पदावरील नियुक्ती होत नाही. एखादया पदावरील नियुक्तीसाठी नियमानुसार भरती ही पुर्व अर्हता आहे. एखादया कामावरील रोजंदारी कर्मचाऱ्याचे ते काम संपल्यामुळे त्यांना इतर दुसऱ्या रिक्त जागांवर नेमणूक देण्याचे आदेश न्यायालय देऊ शकत नाही. हा प्रकार जर न्यायालयाकडून चालू राहीला तर न्यायालये हा भरतीचा एक मार्ग बनतील. एखादया पदावरील रोजंदारी कर्मचाऱ्याच्या माध्यमातून नियुक्ती ही पाठीमागच्या दाराने केलेली नियुक्ती (Back door entry ) समजण्यात येईल. जरी एखादया आस्थापनेवर पदे रिक्त असतील तरीही त्या पदावर रोजंदारी कर्मचारी नियुक्त करण्याचे निदेश न्यायालय देवू शकत नाही. आस्थापनेवर रिक्त जागा हया पदभरतीच्या नियमानुसारच भरल्या पाहीजेत. कायदयाच्या स्थापीत नियमानुसार वर्ग ४ च्या कर्मचाऱ्यांची नियुक्ती सुध्दा नियमानुसार होणे ही पूर्व अट आहे. जे कर्मचारी तातडीच्या व तात्पुरत्या स्वरुपाचे काम करतात त्यांची नेमणूक तात्पुरत्या स्वरुपाच्या कामासाठी करतात. त्यांची नेमणूक ही कुठल्याही पदावर करण्यात आलेली नसते. हे कर्मचारी तातडीचे व तात्पुरते काम चालू असेपर्यंतच काम करणे अपेक्षित आहे.

ग) मा. सर्वोच्च न्यायालय निर्णय सिव्हील अपील क्र.८५४१/१९९७, दि.१४.११.२००० सुभेदार सिंग व इतर विरुध्द जिल्हा न्यायाधिश मिर्झापूर आणि इतर या निर्णयानुसार जिल्हा न्यायाधिशांनी केलेल्या नियुक्त्या हया मोठया प्रमाणावरील अनियमित / बेकायदेशीर नियुक्त्या दिसून आल्या आहेत. अशाप्रकारे नेमलेल्या कर्मचाऱ्यांना भारतीय घटनेच्या कलम २२६ अन्वये न्यायालयाला प्राप्त झालेल्या स्वेच्छाधिकाराअंतर्गत मार्फत दाद मागण्याचा हक्क पोहचत नाही.

ह) भंडारा नगरपरिषद विरुध्द जयवंतीभाई आणि इतर प्रकरण १९९८ (३) Mh LJ ७६५ या मा. उच्च न्यायालय, नागपूर यांनी दिलेल्या निर्णयानुसार नगरपरिषदेने एखादया व्यक्तीस रोजंदारी कर्मचारी म्हणून घेतल्यास अशा कर्मचाऱ्यास संचालक, नगरपरिषद प्रशासन यांच्या मान्यतेशिवाय कायम करता येतील काय हा प्रश्न उपस्थित झाल्याबाबत मा. न्यायालयाने असा निर्णय दिला की सदर पदे अस्तित्वात नसतांना किंवा पद अस्तित्वात असल्याशिवाय अशा कर्मचाऱ्यांना कायम करण्याचा प्रश्नच उद्‌भवत नाही.

प) तसेच मा. सर्वोच्च न्यायालयाचे खालील याचिकांमधे दिलेले निर्णय सुध्दा विचारात घेण्यात यावे.

1) 2 SCC 204/1994,
2) 2 SRC 799/1972,
3) 2 SCC 486/1993, SCC (L&S) 607/1993, 24 ATC 259/1993,
4) 2 SCC 213/1993, SCC (L&S) 412/1993, 24 ATC 117/1993,
5) 2 SCC 630/1994, SCC (L&S) 723/1994, 24 ATC 56/1994,
6) 3 SCC 458/2003,
7) 4 SCC 99/1992,
8) 5 SCC 12/2003,
9) 8 SCC 248/2003,
10) 10 SCC 405/2003,
11) 4 SCC 33/1992,
12) (10) SCALE 388/2003,
13) 7 SCC 511/2003,
14) 2 SCC 130/2004,
15) (2) SC 88/2003

४) बहुतेक नगरपरिषदेच्या कोर्टातील प्रकरणे ही वरील न्यायालयातील निकालाच्या प्रकरणासारखीच आहेत. त्यामुळे उपरोक्त नमूद केलेले न्यायालयाचे निर्णय हे या प्रकरणांनाही लागू होतील.

५) नगरपरिषदेमध्ये अनियमित/ रोजंदारीवर/ कंत्राटीपध्दतीवर/ हंगामी कामगारांसंदर्भात न्यायालयीन प्रकरणे उद्‌भवल्यास मा. सर्वोच्च व उच्च न्यायालयाच्या निर्णयांचा आधार घेऊन परिच्छेद निहाय उत्तरे तयार करण्याची दक्षता

घ्यावी. जेणेकरुन कामगार / औद्योगिक / जिल्हा / उच्च न्यायालयांना सर्व परिस्थितीची जाणीव होईल व आपल्या विरोधात न्यायालयाचा निकाल लागण्याची शक्यता राहणार नाही.

६) यापुढे प्रादेशिक संचालक, जिल्हाधिकारी व मुख्याधिकारी यांनी अशा प्रकारच्या न्यायालयीन प्रकरणांमध्ये वरील मा. न्यायालयाचे आदेश विचारात घेऊन त्याप्रमाणे परिच्छेद निहाय उत्तरे तयार करुन मा. न्यायालयात सादर करण्याची कार्यवाही करावी. आपल्या नगरपरिषदेशी संबंधित न्यायालयीन प्रकरणी वरील नमूद केलेल्या मा. उच्च व सर्वोच्च न्यायालयाच्या निवाडयातील जी प्रकरणे आपल्या प्रकरणाशी लागू होतात ते आपल्या वकीलांशी चर्चा करुन ठरवावीत व त्याचा संदर्भ न्यायालयात परिच्छेद निहाय उत्तरे देतांना घ्यावा.

७) परिच्छेद निहाय उत्तरे तयार करतांना वरील बाबी विचारात घेऊन परिच्छेद निहाय उत्तरे सादर करावी. असे न केल्यास जबाबदार अधिकाऱ्याविरुध्द शिस्तभंगाची कडक कारवाई करण्यात येईल, याची कृपया नोंद घ्यावी.

( सुनील सोनी )
आयुक्त तथा संचालक
नगरपरिषद प्रशासन संचालनालय

प्रति,

१) मुख्याधिकारी, नगरपरिषद (सर्व)
२) जिल्हाधिकारी (सर्व)
३) विभागीय आयुक्त तथा प्रादेशिक संचालक (सर्व)
४) उप मुख्य लेखा परिक्षक, स्थानिक निधी लेखा (सर्व)
५) मा. प्रधान सचिव, नगर विकास विभाग, मंत्रालय, मुंबई-३२.
६) कार्यासन अधिकारी (सर्व), नगरपरिषद प्रशासन संचालनालय,
७) निवड नस्ती.